मराठी भाषांतराचीं उपनिषदें.

१.

प्रश्नोपनिषद्.

(मूळ, भाषांतर, आणि टीपा.)

संपादक

गजानन भास्कर वैद्य बी. ए.

प्रकाशक–वैद्य ब्रदर्स,
काळबादेवी रोड, मुंबई.
१९०८.

किंमत ३ आणे.

मराठी भाषांतराचीं उपनिषदें.

१.

प्रश्नोपनिषद्.

(मूळ, भाषांतर, आणि टीपा.)

संपादक

गजानन भास्कर वैद्य बी. ए.

प्रकाशक—वैद्य ब्रदर्स,

काळबादेवी रोड, मुंबई.

१९०८.

किंमत ३ आणे.

रा. रा. गजानन भास्कर वैद्य यांचे मराठी ग्रंथ.

१. सनातनधर्मसंवाद	०— १—०
२. आश्रम आणि आश्रमधर्म	०— ७—०
३. विष्णूचे अवतार	०—१४—०
४. कृष्णदेवकथा (विष्णूचे अवतार यांतील चौथें व्याख्यान निराळें)	०— ३—०
५. देहदानमीमांसा (भारतांतील जन्मकथांचा विचार)	०— ४—०
६. प्रश्नोपनिषद् (मूळ, भाषांतर आणि टीपा)	०— ३—०

प्रकाशक—वैद्य ब्रदर्स

काळबादेवी रोड, मुंबई.

प्रस्तावना.

१. अशा आवृत्तीचा प्रसंग.

धर्मालयाचे किंवा सामान्यतः 'थिऑसफिकल सोसायटीचे' पुष्कळ स्त्रीपुरुष सभासद उपनिषदांचें परिशीलन नियमानें करीत असतात. त्यांपैकीं सर्वांनाच संस्कृत येत असतें असें नाहीं. कोणी संस्कृतांतून तर कोणी इंग्रजी भाषांतरावरूनही शिकतात. परंतु पुष्कळांना मूळ घेऊन मराठींत सांगितलें तर विषय समजण्यास सोपें जातें असा अनुभव येतो; व एके प्रसंगीं 'प्रश्नोपनिषद्' असेंच समजवून सांगत असतां केलेल्या प्रयत्नाचें दृश्य फळ ही आवृत्ति होय.

यांत मूळ छापतांना विरामचिन्हांचा उपयोग केला आहे, तरी सहसा संधिनियमांचा भंग करावयाचा नाहीं असें धोरण ठेवलें आहे. थोडकेंसेंच संस्कृत शिकून मूळ वाचूं पाहाणारांना अशा पद्धतीनें छापलेलें संस्कृत वाचायला व समजायला सोपें जातें म्हणून आम्हीं ही योजना मुद्दाम केली आहे, व अशीच ती दुसऱ्या उपनिषदांच्या आवृत्तींतही करूं.

भाषांतर असें दिलें आहे कीं त्यावरून मूळ समजण्याला मदत होईल. वाक्यपूरणार्थ घातलेले शब्द कौंसांत दिले आहेत; व जास्त स्पष्टीकरणाचा मजकूर टीपांच्या रूपानें निराळा छापला आहे.

अशाच पद्धतीनें आणखी कांहीं उपनिषदें प्रसिद्ध करण्याचा विचार असल्यामुळें या मालेला 'मराठी भाषांतराचीं उपनिषदें' असें समुच्चयवाचक नांव दिलें आहे.

२. प्रश्नोपनिषद्.

प्रस्तुत उपनिषदाचें नांव 'प्रश्नांचें उपनिषद्' अशा अर्थाचें आहे. यांतील विषय प्रश्न आणि उत्तर अशा संवादरूपानें प्रतिपादिलेला असल्यामुळें याला प्रश्नोपनिषद् असें नांव पडलें आहे.

कोणे एके समयीं सहा शिष्य पिप्पलाद ऋषीकडे आले, आणि असें दिसतें कीं त्यांच्या मनांत एकच प्रश्न विचारावयाचा होता (परं ब्रह्म अन्वेषमाणाः १. १.). परंतु कांहीं वेळ आश्रमांत राहिल्यावर ज्याच्या त्याच्या ग्रहणशक्तीप्रमाणें प्रश्न येईल असें जाणून एक वर्ष आश्रमांत रहा व मग प्रश्न विचारा

अशी त्यांना त्या ऋषीची आज्ञा झाली व ते त्याप्रमाणें तेथें व्रतस्थ होऊन राहिले.

ग्रीस वगैरे देशांत जे योगसंप्रदाय होते त्यांतही अशीच चाल असे. एक वर्षपर्यंत केवळ 'श्रावक' (ऐकणारा) होऊन आश्रमांत रहावें लागे व मग प्रश्न विचारण्याला परवानगी मिळे.

श्रावकदशेची मुदत संपतांच सहांचे सहा प्रश्न आले; ते असे–

१. ह्या प्रजा प्रगट होतात त्या कोठून ?

२. प्रजेचें धारण वगैरे कोणते देव करतात ?

३. प्राण उत्पन्न कसा होतो व तो या देहांत कसा येतो ?

४. झोंप कशी येते, व झोंपेंत आणि सुषुप्तींत कोणते व कोणाचे व्यापार चालू असतात ?

५. ओंकाराच्या ध्यानाचें फळ काय ?

६. देहनिवासी आत्मा जो पुरुष म्हणून श्रुत आहे तो कोण ?

हे ते सहांचे सहा प्रश्न. त्यांचीं उत्तरें पिप्पलादानें दिलीं आहेत, तीं अध्ययनानें कळतील.

३. अध्ययन कसें करावें ?

उपनिषदांचें अध्ययन करण्याचे प्रकार दोन आहेत, एक **विवेचन** आणि दुसरा प्रकार **मनन.** विवेचनानें वाक्याचा अर्थ समजून त्यांतील प्रतिपाद्य विषय समजेल, आणि मननानें त्या विषयाचा कांहींसा आत्मप्रत्यय येईल. गीतेवर वामनपंडिताचा 'यथार्थ' हा विवेचनाचा प्रकार, आणि ज्ञानेश्वराचा 'भावार्थ' हा मननाचा प्रकार. तरी भावार्थ म्हणजे शब्दांनीं सांगतां येतो असें म्हणणें नाहीं. सांगणारा ज्ञानेश्वरच असला तर तो कांहींसा प्रयत्न करतो इतकेंच.

विवेचनद्वारा उपनिषदांचा अभ्यास असा करावा. आधीं वचनांचा अर्थ लावावा व मग तो तो विषय विस्तारानें प्रतिपादणारे ग्रंथ अवलोकन करावे. प्रस्तुतच्या उपनिषदांत सृष्टि, प्रजा, देवतांचें कार्य, इंद्रियांची प्रवृत्ति, प्राणाचें व्यापकत्व, निद्रा, स्वप्न, प्रणव, पुरुष, वगैरे विषय आले आहेत. त्यांच्याविषयींचीं प्रमेयें विस्तृत रीतीनें आत्मविद्येच्या ग्रंथांत दिलेलीं असतात. तत्संबंधीं उपनिषदांचे बोल केवळ सूत्ररूप आहेत.

मननद्वारा उपनिषदांचा अभ्यास कसा करावा हें सांगणें वरच्या इतकें सोपें नाहीं. एकेक वचन घेऊन त्यावर चिंतन, मनन, ध्यान करावें. याला मनाची एकाग्रता लागते व ती प्रयत्नानें साध्य करावयाची असते. विवेचन करून आपण प्रमेयांचें ज्ञान दुसऱ्यांपासून बाहेरून घेतों; आणि मनन करून वस्तुस्थितीची ओळख अंतरात्म्यापासून आंतून घेऊन उदयाला आणतों. पहिल्याचें स्वरूप अनुमान; दुसऱ्याचें अनुभव. पहिल्याचें फळ पांडित्य; दुसऱ्याचें आत्मानुभव.

विवेचन आणि मनन ह्या दोन्ही बाजूंनीं आत्मविद्येचे ग्रंथ कसे समजून घ्यावे ह्याची व्यवस्थित व विस्तृत माहिती सांगणारे कित्येक बहुमोल ग्रंथ थिऑसफीच्या वाङ्मयांत इंग्रजींत प्रसिद्ध झाले आहेत. ते जिज्ञासूंनीं अवलोकन करून पाहाण्यासारखे आहेत.

४. मननाविषयीं एक सूचना.

मननाच्या प्रकाराविषयीं कोणाला प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहावयाचाच असेल तर आम्ही एक आचार सुचवितों तो करून पाहावा. मननाचा ग्रंथ कोणताही असो, उपनिषदें असोत कीं गीता असो; आचार एकच. तो असा. (१) रोज मननाला बसावयाचें असा नियम करावा; (२) मननाला बसावयाची जागा पूजागृहांत कायमची ठरवून तेथें आसन मांडावें व तें कधीं बदलूं नये; आज एके जागीं व उद्यां दुसरे जागीं असें करूं नये; (३) मननाची वेळही कायम करावी व निश्चित वेळीं रोज मननाला बसावें; पहांटेची वेळ साधल्यास चांगलें; जागें होतांच प्रातर्विधि व गार पाण्याचें स्नान करून कोणाशीं न बोलतां व व्यवहारविषयाचा विचार मनांत न आणतां आसनावर जाऊन बसावें; (४) तेथें त्या दिवशींचें वचन मननाला घ्यावें व तें आधीं पांच चार वेळां सावकाश व गात गात मधुर ध्वनीनें वाचावें– त्याचें गान करावें, व मग डोळे मिटून त्यांतील विचारावर मनन करावें; (५) मननाला दहा मिनिटें तरी द्यावीं व तितका वेळ मनाच्या डोळ्यापुढें त्या वचनांतील विचाराशिवाय दुसरा विषय येऊं देऊं नये; (६) ही मननक्रिया, हृदयाचे ठिकाणीं गुहेसारख्या पोकळींत बसून आपण मनन करीत आहों, अशी करावी; (७) रोज एकेक वचन नवें घ्यावें व तें आदल्या दिवशींच पाहून ठेवावें; म्हणजे उद्यां सकाळीं ज्या वचनावर मनन

करणार तें आज रात्रीं निजावयाच्या आधीं वाचून व शक्य असल्यास संस्कृतांतच पाठ करून त्यांतील विचार ध्यानांत ठेवून निजावें.

ह्या आचाराची उपपत्ति वगैरे येथें न सांगतां आम्ही इतकेंच म्हणतों कीं पटेल त्यांनीं अनुभव घेऊन पाहावा.

आत्मविद्येंत असा एक विचार आहे कीं देह निजतो तेव्हां देही जीव जो आहे तो रात्रभर देहाच्या बाहेर असतो. तो देहाच्या जवळच राहतो किंवा दूर जातो. तेव्हां तो सूक्ष्म देहांत असल्यामुळें कोणी ज्ञानी पुरुष भेटला तर तो त्याला कृपावंत होऊन ज्ञान देऊं शकतो. तो निजतांना चांगला विचार करून निजेल तर चांगला अनुभव मिळवील. उपनिषदांचा मननाभ्यास चालला असतां तो दैववशात् रात्रीं देहाबाहेर असतां ऋषींच्या आश्रमांत जाईल व उपनिषद्रहस्य शिकेल आणि पहांटेस मननाला बसला असतां रात्रीं सूक्ष्मशरीरांत शिकलेल्या ज्ञानाची आठवण त्याला स्थूलदेहांत होईल.

५. उपनिषदांची सूत्ररूप रचना.

ऋषि ज्ञान 'पाहातात.' ते तें सूक्ष्मावस्थेंत पाहातात. पहिल्या अनुभवाच्या वेळीं काय, किंवा ग्रंथ लिहितांना काय, असेंच होत असतें. सूक्ष्मांत ज्ञान दिसतें तें एकाग्र मनानें पाहून व तसेंच तें दृष्टीसमोर दिसतें ठेवून ग्रंथांत शब्दांनीं लिहावयाचें असतां ते बोल सूत्ररूप येतात. वाक्यांत कर्ता-कर्म-क्रियापद बरोबर आहे कीं नाहीं इकडे ध्यान रहात नाहीं, कारण सगळें ध्यान सूक्ष्मांतील देखाव्याकडे असतें.

हीं सूत्ररूप वचनें मननाला घेतलीं तर कदाचित् आपली संवेदना वरच्या भूमिकेवर जाईल व तेथें जें आणि जसें ज्ञानचित्र ग्रंथकाराच्या मनोमय दृष्टीसमोर होतें तें व तसेंच आपल्यालाही लखलखीत दिसेल व त्याची आठवण आपण जडदेहांत आणूं. उपनिषदांतील आत्मविद्या अशी पाहिलेली आहे, व आतां पाहावयाची तर त्याच वाटेनें गेलें पाहिजे, आणि गेलें तर ती प्राप्त झाल्यावांचून रहाणार नाहीं.

६ उपनिषदांतील तत्त्वविद्या.

उपनिषदें हे वेदान्ताचे ग्रंथ. उपनिषदांतील तत्त्वविद्या वेदान्त होय. कोणी वेदान्त म्हणजे वेदग्रंथांतील शेवटचा भाग असें घेतात, व कोणी वेदान्त म्हणजे

त्या शेवटच्या भागांतील सिद्धांत असें घेतात. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं वेदान्त म्हणजे वेदाचे किंवा ज्ञानाचे अंतिम सिद्धांत (First Principles of Things.). ह्या अंतिम सिद्धांतांनाच तत्त्वविद्या म्हणतात.

उपनिषदांत तत्त्वविचार आहे तो देव, जीव, जगत् व व्यवहार यांविषयीं आहे. आचार्यांचें एक श्लोकार्ध असें आहे—

ब्रह्म सत्यं जगन् मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।

' सर्वव्यापी दिव्यतत्त्व सत्स्वरूप आहे, तशी ही सृष्टि नाहीं; जीव कोणी निराळा नसून ब्रह्मरूपच आहे. ' अशा स्वरूपाची तत्त्वविद्या उपनिषदांत आहे.

१. ब्रह्मवस्तु केवलत्वानें पाहातां कल्पनेच्या आणि वाणीच्या पलीकडे आहे. सृष्टीचा संकल्प त्या ब्रह्मांत झाला अशा अवस्थेविषयीं बोलतांना ऋषींचा मुकेपणा जाऊन ते त्याविषयीं कांहीं बोलूं लागले. ' सदेव सोम्येदमग्र आसीत् ' (छां० ६. २. १.). आधीं एक ' सत् ' होतें. ' तें आहे ' (सत्) इतकें बोललें म्हणजे त्याविषयीं बोलणें खुंटलें.

२. ' तदैक्षत बहु स्याम् प्रजायेय ' त्याला वाटलें आपण बहु व्हावें. यामुळें सृष्टि झाली.

तें अव्यक्त असून आपल्याच अंगच्या दिव्यमायाशक्तीनें एकीकडे ईश्वर असें, व दुसरीकडे नानात्वरूपी जगत् असें, प्रगट झालें. माया तेथें ईश्वर, आणि ईश्वर तेथें माया, असें नित्य आहे. माया आहे म्हणून ईश्वर आहे, ईश्वर आहे म्हणून माया आहे. अशी ही उमा शिवाची अर्धांगी व शिव उमेचें अर्धांग होय.

३. ईश्वराचेच अंशभूत जीव होत. ईश्वर जीवरूपानें येऊन जडमायेचाही धनी होणार. उपाधीच्या अडचणीमुळें त्याला आपलें काम लवकर साधत नाहीं. तो आधीं चिदात्मा, पुढें जीवात्मा, व मग जड उपाधींत प्राणात्मा होतो. येथेंच तो शेवटीं आत्मस्वरूप ओळखून शिवपदारूढ होणार. उपाधीची अनुकूलता सिद्ध करणें हेंच योगाचें काम. हें साधण्याचा मार्ग कोणता तें सांगणें हा धर्माचा विषय होय.

७. आत्मविद्या आणि सदाचार.

जीवाचा वियोग सत्पदापासून झाला. त्यानेंच आपल्याला स्वेच्छेनें व आनंदानें उपाधींत बद्ध करून घेतलें तें अशासाठीं कीं तेथेंच शेवटीं मुक्त व्हावें—

शिवावस्थेंतील मुक्तता जीवावस्थेंत अनुभवास आणावी. हें साधणें अनेक जन्माचें, व प्रत्येक जन्मांतील रोजच्या आचरणाचें, काम होय. सगळी व्यवहारनीति यावर स्थापन केली आहे. जीवाचें जें अंतिम साध्य तें रोजच्या आचरणांत थोडथोडें साधून जीवानें आपलें दिव्यस्वरूप ओळखावें.—

यदात्मतत्त्वेन तु ब्रह्मतत्त्वं
दीपोपमेनेह युक्तः प्रपश्येत् ।
अजं ध्रुवं सर्वतत्त्वैर्विशुद्धं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥

श्वेताश्व० २. १५.

ही अवस्था प्राप्त होणें हें सदाचरणाचें फळ होय. सदाचरणानें जीव वियोगावस्थेंतून योगावस्थेप्रत जाईल. कृष्णदेव म्हणतात–' यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्व इदं ततं । स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥.'

वैद्य ब्रदर्स प्रेस.
काळबादेवी रोड; मुंबई.
१ डिसेंबर १९०७.

गजानन भास्कर वैद्य.



ॐ अथर्ववेदीय

प्रश्नोपनिषद्.

(मूळ, भाषांतर, आणि टीपा.)

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर् यजत्राः ॥
स्थिरैरंगैस् तुष्टुवांसस् तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥ १ ॥

१. अहो देवांनो कल्याणमय जें तें (आम्ही) कानांनीं ऐकूं (असें होवो). अहो पूज्य देवतांनो कल्याणमय जें तें (आम्ही) डोळ्यांनीं पाहूं (असें होवो). (आम्ही) स्थिर अवयवयुक्त देहांनीं (नित्य) स्तवन करीत राहून, देवांनीं नेमलेलें जें आयुष्य (असेल तें सुखानें) घालवूं (असें होवो).

टीपा.—(१)हितं (धा, ठेवणें, देणें) दिलेलें, योजिलेलें.

स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ॥
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर् दधातु ॥ २ ॥

२. सर्वत्र पसरलेल्या कीर्तीचा इंद्र आमचें कल्याण करो. सर्व जाणणारा पूषन् (सूर्यदेव) आमचें कल्याण करो. अबाधित चक्राचा अरुण आमचें कल्याण करो. आमचें कल्याण बृहस्पति करो.

टीपा.—(१)अ + रिष्ट + नेमि. (२) दधातु, देवो. हें क्रियापद पहिल्या तीन चरणांतही घ्यावें. (३) 'स्वस्ति नस्तार्क्ष्योऽरिष्टनेमिः' असाही पाठ आम्हीं ऐकला आहे.

ॐ सुकेशा च भारद्वाजः, शैब्यश्च सत्यकामः, सौर्यायणी च गार्ग्यः, कौसल्यश्चाश्वलायनो, भार्गवो वैदर्भिः, कबंधी कात्यायनस्, ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणा 'एष ह वै तत् सर्वं वक्ष्यति' इति ते ह समित्पाणयो भगवंतं पिप्पलादं उपसन्नाः ॥ १ ॥

१. भारद्वाजवंशी सुकेश, शैब्यवंशी सत्यकाम, सौर्यायणिवंशी गार्ग्य, आश्वलायनवंशी कौसल्य, वैदर्भदेशी भार्गव, कात्यायनवंशी कबंधी, असे ते ब्रह्मपर आणि ब्रह्मनिष्ठ (असून) पर ब्रह्माविषयीं चौकशी करीत असतां 'हा आम्हांला तें सर्व सांगेल' असें म्हणून ते समिधा हातीं घेऊन (शिष्यभावानें) भगवान पिप्पलाद ऋषीकडे गेले.

टीपा.—(१) सुकेशा (सुकेश), सौर्यायणी (सौर्यायणि) हीं छांदस रूपें. (२) समित्पाणयः समिद्भारगृहीतहस्ताः.

तान् ह स ऋषिरुवाच 'भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ, यथाकामं प्रश्नान् पृच्छत, यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम' इति ॥ २ ॥

२. त्यांना तो ऋषि म्हणाला कीं 'तुम्ही आणखी एक वर्षभर ब्रह्मचर्यानें आणि श्रद्धेनें तप करीत (मोठ्या) दक्षतेनें रहा; (मग) मनांत येतील ते प्रश्न विचारा; मला जर सांगतां आलें तर तुम्हांला मी सर्व सांगेन.'

टीपा.—(१) संवत्स्यथ, सम् सम्यक् शिष्यभावाच्या नियमांप्रमाणें. (२) यथाकामं, यो यस्य कामः तं अनतिक्रम्य. ज्याच्या मनांत जो प्रश्न येईल तो त्यानें व्यक्तिशः विचारावा.

प्रश्न पहिला.

अथ कबंधी कात्यायन उपेत्य पप्रच्छ 'भगवन् कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्ते' इति ॥ ३ ॥

३. पुढें कात्यायनवंशी कबंधी हा त्याजपाशीं जाऊन प्रश्न विचारता झाला कीं 'भगवन् कोठून बरें या प्रजा उत्पन्न होतात ?'

टीपा.—(१) अथ, संवत्सराद् ऊर्ध्वं. (२) प्रजाः, स्थावरजंगम वस्तुजात.

तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः, स तपोऽतप्यत, स तपस्तप्त्वा स मिथुनं उत्पादयते रयिं च प्राणं चेति 'एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यतः' इति ॥ ४ ॥

४. त्याला तो म्हणाला कीं (कल्पारंभीं) प्रजापतीला प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा होते (आणि त्यासाठीं) तो तप करतो. तप करून तो रयि (जडद्रव्य) आणि प्राण (चैतन्य) अशांचें एक जोडपें 'हे माझ्या इच्छेप्रमाणें नानाविध प्रजा उत्पन्न करतील' असें (चिंतन करून) निर्माण करतो. (असा आरंभ करून तो सूर्यचंद्र उत्पन्न करतो).

टीपा—(१) प्रजाकामः, कल्पादौ आत्मनः प्रजाः सिसृक्षुः. (२) मिथुनं, सृष्टिसाधनभूतं द्वंद्वं. (३) रयि (पु० न० लिंगी) पाणी, जडद्रव्य, प्रकृति. (४) एवं संचिंत्य अंडोत्पत्तिक्रमेण सूर्याचंद्रमसौ अकल्पयत्.

आदित्यो ह वै प्राणो, रयिरेव चंद्रमा, रयिर् वा एतत् सर्वं यन् मूर्तं चामूर्तं च, तस्मान् मूर्तिरेव रयिः ॥ ५ ॥

५. सूर्य हा प्राण, चंद्र हा रयि; किंवा हें सर्व जें मूर्त व अमूर्त आहे तें रयि; त्यांतून मूर्तवस्तु तर (उघड) रयि.

टीपा.—(१) गुणप्रधानकृतो भेदः, हा भेद प्रधान गुणांवरून केला आहे. (२) तस्मात्, प्रविभक्ताद् अमूर्ताद् अन्यत्.

अथादित्य उदयन् यत् प्राचीं दिशं प्रविशति तेन प्राच्यान् प्राणान् रश्मिषु संनिधत्ते । यद् दक्षिणां, यत् प्रतीचीं, यद् उदीचीं, यद् अधो, यद् ऊर्ध्वं, यद् अंतरा दिशो, यत् सर्वं प्रकाशयति तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु संनिधत्ते ॥ ६ ॥

६. तदनंतर, सूर्य उगवून जेव्हां पूर्व दिशेस येतो तेव्हां (तो) पूर्वेकडील प्राणांस (आपल्या) किरणांत मिळवून घेतो. जेव्हां दक्षिणेस (येतो), जेव्हां पश्चिमेस (येतो), जेव्हां उत्तरेस (येतो), जेव्हां अधोदिशेस (येतो), जेव्हां ऊर्ध्वदिशेस (येतो), जेव्हां (तो) मधल्या दिशांस (येतो), (याप्रमाणें) जेव्हां (तो) सर्व (प्रदेश) प्रकाशित करतो, तेव्हां (तो) सर्व (ठिकाणच्या) प्राणांस आपल्या किरणांत मिळवून घेतो.

टीपा.—(१) संनिधत्ते संनिवेशयति आत्मभूतान् करोति. (२) अंतरा दिशः कोणदिशः अवांतरदिशः. (३) तेन स्वप्रकाशव्याप्त्या.

स एष वैश्वानरो विश्वरूपः प्राणोऽग्निरुदयते। तदेतद् ऋचाभ्युक्तं॥७॥

७. असा तो (सूर्य) वैश्वानर (सर्वजीवात्मक), विश्वरूप (सर्वरूपात्मक), प्राण (आणि) अग्नि (होऊन) उगवतो. तें (त्याचें स्वरूप एका) ऋचेंत असें वर्णिलें आहे—

टीपा.—(१) वैश्वानरः, नराः जीवाः विश्वे (सर्वे) च ते नराश्च विश्वानराः स एव वैश्वानरः सर्वजीवात्मकः. (२) विश्वरूपः सर्वप्रपंचात्मकः.

विश्वरूपं हरिणं जातवेदसं।
परायणं ज्योतिरेकं तपंतं ॥
सहस्ररश्मिः शतधा वर्तमानः।
प्राणः प्रजानां उदयत्येष सूर्यः ॥ ८ ॥

८. सर्वरूपधारी, श्वेतवर्णयुक्त, सर्व वस्तु जाणणारा, (सर्वांचा) आश्रय, देदीप्यमान अशी निरुपम ज्योति, (अशा त्याला ब्रह्मवादी जाणतात). तो सूर्य असंख्यकिरणयुक्त आणि शेंकडों (भिन्न कोटींतील प्राण्यांत) वास करणारा प्रजांचा प्राण (होऊन) उगवतो.

टीपा.—(१) परायणं सर्वप्राणाश्रयं. (२) पहिल्या दोन ओळींत द्वितीया विभक्ति आहे, दुसऱ्या दोन ओळींत प्रथमा आहे. (३) एकं अद्वितीयं स्वात्मानं सूर्यं विज्ञातवंतो ब्रह्मविदः.

संवत्सरो वै प्रजापतिस्॒ तस्यायने दक्षिणं चोत्तरं च । तद् ये ह वै तद् इष्टापूर्ते कृतमित्युपासते, ते चांद्रमसमेव लोकं अभिजयंते, त एव पुनरावर्तंते। तस्माद् एत ऋषयः प्रजाकामा दक्षिणं प्रतिपद्यंते । एष ह वै रयिर् यः पितृयाणः ॥ ९ ॥

९. (सूर्यचंद्रकृत) संवत्सररूपक जो प्रजापति त्याचे मार्ग दोन, दक्षिणमार्ग आणि उत्तरमार्ग. जे यज्ञ व दान हें (कर्म ज्ञानयुक्त न करतां) केवलकर्म म्हणून करतात, ते केवळ चंद्रलोक मिळवितात, (आणि) ते पुन्हा

(भूलोकीं) परत येतात. यामुळें प्रजा इच्छिणारे ऋषि दक्षिणमार्ग धरतात. हा जो पितृमार्ग तो रयि होय.

टीप.—(१) इष्ट+पूर्त.

अथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्ययात्मानं अन्विष्यादित्यं अभिजयंते । एतद् वै प्राणानां आयतनं, एतद् अमृतं अभयं, एतत् परायणं, एतस्मान् न पुनरावर्तन्त इत्येष निरोधस् तदेष श्लोकः ॥ १० ॥

१०. आणि उत्तरमार्गानें (जाणारे जे ते) तपानें, ब्रह्मचर्यानें, श्रद्धेनें, (आणि) विद्येनें आत्म्याचा शोध करून (प्रजापतीचें प्राणांग जो) सूर्य (तो) मिळवितात. तो (सर्व) प्राणांचें माहेरघर, तो अविनाशी (असून) त्याला (चंद्रासारखें क्षयवृद्धिग्रहणांचें) भय नाहीं. ती (ज्ञानवानांची) परम गति असून तेथून त्यांना पुन्हा (भूलोकीं) परत यावें लागत नाहीं. असा तो (केवलकर्मी जे त्यांना) अप्राप्य होय. याविषयीं असा श्लोक आहे—

टीपा.—(१) उत्तरेण अयनेन प्रजापतेः अंशं प्राणं आदित्यं अभिजयंते. (२) विद्यया आत्मविषयया. (३) आत्मानं अन्विष्य अहमस्मीति विदित्वा. (४) एष निरोधः अविदुषां.

पंचपादं पितरं द्वादशाकृतिं ।
दिव आहुः परे अर्धे पुरीषिणं ॥
अथेमे अन्य, उ परे विचक्षणं ।
सप्तचक्रे षडर आहुरर्पितं ॥ इति ॥ ११ ॥

११. तो (सूर्य) पांच पायांचा (आणि) बारा अवयवांचा असून (सर्व वस्तूंचा) उत्पादक, (व) स्वर्गाच्या वरच्या प्रांतांत जल धारण करणारा, असें कोणी म्हणतात. आणि दुसरे म्हणतात कीं तो (स्वतः) ज्ञाता असून सहा सहा आरांच्या सात चक्रांनीं युक्त अशा (एका रथामध्यें) स्थापन केलेला आहे.

टीपा.—(१)सूर्यपर अर्थात पांच पाद म्हणजे हेमंतशिशिर एक धरून पांच ऋतु, आणि बारा अवयव (आकृतयः अवयवाः) म्हणजे बारा महिने. (२) परे अर्धे, ऊर्ध्वे स्थाने. थिऑसफीच्या भाषेत हा ' अरूप प्रांत.' वैदिक भाषेत अर्ध (पुल्लिंगी) म्हणजे स्थान, प्रांत, घर, वसतिस्थान. (३) पुरीषं म्हणजे सामान्यतः मळ, पण वैदिक भाषेत पाणी किंवा जीवन. (३) अर्पितं, रथनाभौ निविष्टं.

मासो वै प्रजापतिस्, तस्य कृष्णपक्ष एव रयिः शुक्लः प्राणस् तस्मादेत ऋषयः शुक्ल इष्टं कुर्वंति, इतर इतरस्मिन् ॥ १२ ॥

१२. एक महिना हा प्रजापति. त्याचा कृष्णपक्ष तो रयि. आणि शुक्लपक्ष तो प्राण. यामुळें (जाणते) ऋषि शुक्लपक्षांत यज्ञयाग करतात, आणि (ज्ञानरहित जे) दुसरे (ते) दुसऱ्या (पक्षांत करतात.)

टीपा.—(१)एते ऋषयः, प्राणदर्शिनः एते ऋषयः. (२) इतरे, इतरे तु प्राणं न पश्यंति अदर्शनलक्षणं कृष्णात्मानमेव पश्यंति.

अहोरात्रो वै प्रजापतिस्, तस्याहरेव प्राणो रात्रिरेव रयिः । प्राणं वा एते प्रस्कंदंति ये दिवा रत्या संयुज्यंते, ब्रह्मचर्यमेव तद् यद् रात्रौ रत्या संयुज्यंते ॥ १३ ॥

१३. एक अहोरात्र हा प्रजापति. त्यांतील दिवस तो प्राण, आणि रात्र रयि. जे (मूढ) दिवसा स्त्रीसंग करतात ते प्राण ओततात; जे रात्रीं स्त्रीसंग करतात त्यांचें तें करणें ब्रह्मचर्यच होय.

टीपा.—(१)प्रस्कंदंति निर्गमयंति शोषयंति वा. (२) रत्या रतिकारणभूतया सह स्त्रिया.

अन्नं वै प्रजापतिस्, ततो ह वै तद् रेतस्, तस्माद् इमाः प्रजाः प्रजायन्ते, इति ॥ १४ ॥

१४. अन्न हें प्रजापति. त्या (अन्ना) पासून रेत (होतें); त्या (रेता) पासून ह्या (सर्व) प्रजा उत्पन्न होतात. हें (विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर होय).

टीपा.—(१)इति, यत् पृष्टं 'कुतो ह वै प्रजाः प्रजायंते' इति तद् एवं चंद्रादित्यमिथुनादिक्रमेण अहोरात्रांतेन अन्न-असृग्-रेतोद्वारेण इमाः प्रजाः प्रजायंते इति निर्णीतं. (२) आनी बेझंट बाई एके ठिकाणीं लिहितात 'मनुष्यें, पशु आणि वनस्पति यांतील

उत्पादकशक्ति हें, आम्ही सर्व ज्यापासून देहसंपन्न झालों त्या विश्वात्मक प्राणाचें, जडद्रव्यांत पडलेलें प्रतिबिंब होय. वस्तुतः ही शक्ति अत्यंत पवित्र आहे, पण तिचा हीन कार्यीं उपयोग करण्यांत येतो.'

" The creative power in men, animals and plants, is the reflexion, in gross matter, of the Universal Life whereof we are all begotten. Holiest of powers, verily, though degraded to vilest uses. "—Annie Besant. (*Theosophist. April 1907.*)

तदं ये ह वै तत् प्रजापतिव्रतं चरंति ते मिथुनं उत्पादयंते । तेषां एवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं, येषु सत्यं प्रतिष्ठितं ॥ १५ ॥

१५ असें असल्यामुळें, जे प्रजापतीचें तें व्रत आचरतात ते (पुत्र कन्या अशी) दोन (प्रकारची प्रजा) उत्पन्न करतात. (साधा ब्रह्मलोक झाला तरी तो इतक्यानेंच त्यांना मिळत नाहीं, कारण हें आचरण अज्ञ माणसांकडूनही होत असतें. तर त्यांपैकीं) जे तप व ब्रह्मचर्य आचरतात, आणि ज्यांच्यांत सत्य हें स्वाभाविक झालें आहे, त्यांनाच (अपर) ब्रह्मलोक (चंद्रलोक) मिळतो.

टीपा.—(१)मिथुनं, पुत्रं दुहितरं च. (२) ब्रह्मचर्यं, ऋतौ अन्यत्र मैथुन-असमाचरणम् ब्रह्मचर्यं.

तेषां असौ विरजो ब्रह्मलोको न येषु जिह्मं अनृतं न माया च, इति ॥ १६ ॥

१६. (परंतु) ज्या (ज्ञानवान) मनुष्यांत कुटिलता नाहीं, असत्य नाहीं, मिथ्याचार नाहीं, त्यांनाच शुद्ध ब्रह्मलोक (सूर्यलोक) मिळतो. असें (आणखी पिप्पलाद म्हणाला.)

टीपा.—(१)माया नाम बहिर् अन्यथा आत्मानं प्रकाश्य अन्यथा एव कार्यं करोति सा माया मिथ्याचाररूपा. (३) इति, एषा ज्ञानयुक्तकर्मवतां गतिः.

याप्रमाणें पहिल्या प्रश्नाचा विचार झाला.

प्रश्न दुसरा.

अथ हैनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ 'भगवन् कत्येव देवाः प्रजां विधारयंते, कतर एतत् प्रकाशयंते, कः पुनर् एषां वरिष्ठः' इति ॥ १ ॥

१. नंतर त्या (पिप्पलाद ऋषीला) वैदर्भदेशी भार्गव (प्रश्न) विचारता झाला कीं 'भगवन् किती बरें देव प्रजेचें धारण करतात ? (त्यांपैकीं) कोणते (देव) हें (शरीर) प्रगट करतात ? आणि त्या (सर्वांत) श्रेष्ठ कोण बरें?'

टीपा.—(१) प्रजां शरीरलक्षणां. प्रजाशब्देन शरीरमेव गृह्यते न जीवः तस्य प्राणधारकत्वेन तद्धार्यत्व-अभावात्.

तस्मै स होवाच आकाशो ह वा एष देवो, वायुरग्निरापः पृथिवी वाङ् मनश् चक्षुः श्रोत्रं च । ते प्रकाश्याभिवदंति 'वयं एतद् बाणं अवष्टभ्य विधारयामः' ॥ २ ॥

२. त्याला तो म्हणाला कीं असा (श्रेष्ठ) देव आकाश (प्राण) होय. (दुसरे देव) वायु, अग्नि, जल, पृथ्वी, वाक्, मन, चक्षु, आणि श्रोत्र हे होत. ते (एकदां देह) प्रगट केल्यावर अभिमानानें म्हणूं लागले (कीं) 'आम्ही हें शरीर जुळवतों व धारणही (आम्हीच) करतों.'

टीपा.—(१)प्रकाश्य, स्वकार्यं प्रकाश्य सर्वलोकप्रकटं यथा तथा कृत्वा. (२) बाणं शरीरं कार्यकारणसंघातं. बाण हा पंच (पांच) ह्या अंकाचा वाचक शब्द आहे, यावरून पंचभूतात्मक देह असा त्या शब्दाचा अर्थ झाला असावा. (३) वयं विधारयामः, मया एव एकेन अयं संघातः ध्रियते इति एकैकस्य अभिप्रायः.

तान् वरिष्ठः प्राण उवाच 'मा मोहं आपद्यथाऽहमेवैतत्, पंचधात्मानं प्रविभज्यैतद् बाणं अवष्टभ्य विधारयामि' इति ॥ ३ ॥

३. (तें ऐकून) श्रेष्ठ जो प्राण तो त्यांना म्हणाला कीं '(बाबांनो) असे मोहांत पडूं नका, मीच तें (सर्व करतों); (मीच) आपले पांच विभाग करून हें शरीर जुळवतों आणि धारण करतों.'

टीपा.—(१)मा मोहं, अविवेकतया अभिमानं मा कुरुत. (२) पंचधा, प्राण अपान व्यान उदान समान असे पांच विभाग.

तेऽश्रद्दधाना बभूवुः, सोऽभिमानाद् ऊर्ध्वं उत्क्रमत इव । तस्मिन्न् उत्क्रामत्यथेतरे सर्व एवोत्क्रामंते, तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्व एव प्रातिष्ठंते । तद् यथा मक्षिका मधुकरराजानं उत्क्रामंतं सर्वा एवोत्क्रामंते, तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्वा एव प्रातिष्ठंते; एवं वाङ् मनश् चक्षुः श्रोत्रं च ते प्रीताः प्राणं स्तुन्वंति ॥ ४ ॥

४. (हें) त्यांना खरें वाटत नाहीं (असें पाहून) तो रागारागानें (देहा) बाहेर निघून जाऊं लागला. तो जसा बाहेर जाऊं लागला तसे (त्याच्या-बरोबर) इतरही सगळे (भराभर) बाहेर पडूं लागले, आणि तो जसा थांबला तसे तेही सगळे जागच्या जागीं राहिले. जशा मधमाशा आपला राजा बाहेर जाऊं लागला म्हणजे त्या सगळ्या त्याच्याबरोबर बाहेर जातात आणि तो थांबला म्हणजे त्या सगळ्या (एकदम) थांबतात, तसा (हा प्रकार झाला आणि) वाक् मन चक्षु श्रोत्र हे (देव) प्राणाची (योग्यता ओळखून) आनंदानें त्याची स्तुति करूं लागले.

टीप.—(१) उत्क्रामते इव, निघून जातों असें मिष केलें.

‘ एषोऽग्निस् तपति, एष सूर्य, एष पर्जन्यो, मघवान् एष, वायुर् एष पृथिवी रयिर् देवः सद् असच्चामृतं च यत् ’ ॥ ५ ॥

५. ती अशी–‘ हा अग्नि (होऊन) जळत असतो; हा सूर्य (होय); हा पर्जन्य; इंद्र (तो) हा; वायु (तो) हा; पृथिवी (हा), रयि (हा), देव (हा), सत् (हा), असत् (हा), आणि अमृत जें (तेंही हाच).’

टीप.—(१)सत् मूर्त असत् अमूर्त. दृश्य अदृश्य; व्यक्त अव्यक्त.

‘ अरा इव रथनाभौ प्राणे सर्वं प्रतिष्ठितं ।
ऋचो यजूंषि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च ’ ॥ ६ ॥

६. ‘आरा जशा रथनाभींत तसें प्राणांत सर्व कांहीं प्रतिष्ठित झालें आहे. ऋग्मंत्र, यजुर्मंत्र, साममंत्र, यज्ञ, क्षत्रिय, आणि ब्राह्मण (हेही प्राणच होत).’

टीप.—(१)क्षत्रं च ब्रह्म च एव एष प्राणः सर्वं.

'प्रजापतिश् चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे ।
तुभ्यं प्राण प्रजास्त्विमा बलिं हरंति यः प्राणैः प्रतितिष्ठसि'॥७॥

७. 'प्रजापति (तो) तूंच, गर्भाशयांत (जाऊन) रहातोस तूंच, (आईबापांचें) प्रतिरूप होऊन जन्मास येतोस (तूंच). हे प्राणा तूं जो (पंच) प्राणांच्या द्वारें (देहांत) सर्वत्र वावरतोस त्या तुला ह्या प्रजा बलि (आणून) पोहंचवितात.'

टीप.—(१)प्रतिजायसे, पितुर्मातुश्च प्रतिरूपः सदृशः सन् (प्रति) जायसे. प्रतिरूप Double.

'देवानां असि वह्नितमः पितॄणां प्रथमा स्वधा ।
ऋषीणां चरितं सत्यं अथर्वांगिरसां असि' ॥ ८ ॥

८. 'देवांचा (तूं) श्रेष्ठ हविर्वाहक आहेस. पितरांची पहिली स्वधा (तूं). (तूं) अथर्व, अंगिरस् , अशा ऋषींचें सत्य चरित आहेस.'

टीपा.—(१)वह्निशब्दो वहनाद् वह्निरिति यौगिकः. (२)पितृणां, पाठांतर 'पितॄणां'.

'इंद्रस् त्वं प्राण तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता ।
त्वमंतरिक्षे चरसि सूर्यस् त्वं ज्योतिषां पतिः' ॥ ९ ॥

९. 'तूं हे प्राणा तेजानें इंद्र (आहेस); (तूं) रुद्र आहेस; सर्व प्रकारें रक्षणकर्ता (तूं आहेस). तूं अंतरिक्षांत (नित्य) फिरतोस; सूर्य (तूं); तूं नक्षत्रगणांचा पति (आहेस).'

टीप.—(१)रुद्रो ऽसि संहरन् जगत.

'यदा त्वं अभिवर्षस्यथेमाः प्राण ते प्रजाः ।
आनंदरूपास् तिष्ठंति कामायान्नं भविष्यतीति' ॥ १० ॥

१०. 'जेव्हां तूं (पर्जन्य होऊन) वृष्टि करतोस तेव्हां हे प्राणा ह्या तुझ्या प्रजा '(आतां) यथेच्छ अन्न मिळेल' म्हणून आनंदी होऊन रहातात.'

टीपा.—(१)पाठांतर 'अथेमाः प्राणते प्रजाः';प्राणते प्राणचेष्टां कुर्वंति. (२) आनंदरूपाः सुखं प्राप्ता इव. (३) कामाय, इच्छातः.

'व्रात्यस्त्वं प्राणैकऋषिर् अत्ता विश्वस्य सत्पतिः ।
वयमाद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्व नः ' ॥ ११ ॥

११.'हे प्राणा तूं संस्काररहित (मूळचाच शुद्ध आहेस); (तूं) एकर्षि (नामक अग्नि आहेस); (तूं सर्व हवींचें) भक्षण करणारा (आहेस); विश्वाचा सत्पति (तूं आहेस). आम्ही (तुझें) भक्ष्य (तुला) देतों; हे मातरिश्वन् (आकाशव्यापक प्राणा) तूं आमचा पिता आहेस.'

टीपा.—(१)व्रात्यः स्वभावतः एव शुद्धः. (२) विश्वस्य सर्वस्य. (३) आद्यस्य अदनीयस्य हविषः. (४) मातरिश्व (छांदस) मातरिश्वन्. पाठांतर 'पिता त्वं मातरिश्वनः', मातरिश्वनः वायोः.

'या ते तनूर् वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि ।
या च मनसि संतता शिवां तां कुरु मोत्क्रमीः ' ॥ १२ ॥

१२.'जें तुझें (अपान) रूप वाचेंत प्रतिष्ठित आहे, जें (व्यान) श्रोत्रांत (आहे), जें (प्राण) चक्षूंत (आहे), आणि जें (समान)मनाचे ठिकाणीं सतत चालू आहे, तें तें (रूप त्या त्या ठिकाणीं) आहे तसेंच कायम ठेव; (तूं देहा) बाहेर निघून जावूं नको.'

टीपा.—(१)या च मनसि संकल्पादिव्यापारेण संतता समनुगता. (२) शिवा शांता कार्ययोग्या.

'प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत् प्रतिष्ठितं ।
मातेव पुत्रान् रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि नः' इति ॥ १३ ॥

१३. 'हें (भूलोकांतील) सर्व प्राणाच्या अधीन आहे, (आणि) जें स्वर्गलोकांत आहे (तेंही प्राणाच्या अधीन आहे). (हे प्राणा) आई बालकांचें (रक्षण करते) तसें (तूं आमचें) रक्षण कर; आम्हांला (तूं) शक्ति आणि ज्ञान दे.'

टीप.—(१)श्रीः (छांदस), श्रियः (द्वितीया).

याप्रमाणें दुसऱ्या प्रश्नाचा विचार झाला.

प्रश्न तिसरा.

अथ हैनं कौसल्यश् चाश्वलायनः पप्रच्छ 'भगवन् कुत एष प्राणो जायते, कथमायात्यास्मिञ् शरीरे, आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते, केनोत्क्रमते, कथं बाह्यं अभिधत्ते कथं अध्यात्मं' इति ॥ १ ॥

१. नंतर त्या (पिप्पलाद ऋषीला) आश्वलायनवंशी कौसल्य (प्रश्न) विचारता झाला कीं 'भगवन् कोठून बरें हा प्राण उत्पन्न होतो ? (तो) या देहांत कसा येतो ? (तो) आपले पांच विभाग करून (वावरत) कसा रहातो ? (तो) बाहेर निघतो कसा ? (आणि) तो बहिरंगाचें कसें धारण करतो व अंतरंगाचें कसें करतो ?'

तस्मै स होवाचातिप्रश्नान् पृच्छसि, ब्रह्मिष्ठोऽसीति तस्मात् तेऽहं ब्रवीमि ॥ २ ॥

२. त्याला तो म्हणाला कीं (विचारूं नयेत असे) गूढ प्रश्न तूं विचारतोस; (पण तूं) वेदविद्येंत पारंगत आहेस म्हणून तुला मी सांगतों.

टीपा.—(१)अतिप्रश्न, अतिक्रम्य मर्यादां, विषम किंवा सूक्ष्म प्रश्न. (२) ब्रह्मिष्ठ, ब्रह्म म्हणजे वेदविद्या; ती शिकून वेदान्ताचा अधिकारी झालेला.

आत्मन एष प्राणो जायते । यथैषा पुरुषे छायैतस्मिन्न् एतद् आततं मनोकृतेनायात्यस्मिञ् शरीरे ॥ ३ ॥

३. आत्म्यापासून हा प्राण निर्माण होतो. (तो असा.) जशी छाया ही मनुष्यदेहाच्या आधारानें (पडते), (तसें) हें (प्राणतत्त्व) त्या (आत्म्याच्या आधारानें) पडलें आहे. तें मनःकृत (संकल्पामुळें) या देहांत येतें.

टीपा—(१)आत्मनः, चैतन्यामुळें. (२) यथा, बिंब-प्रतिबिंबाचा हा दृष्टांत आहे. (३) मनोकृतेन (संधिः आर्षः), मनःकृतेन.

यथा सम्राड् एवाधिकृतान् विनियुंक्ते 'एतान् ग्रामान् एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व' इति । एवं एवैष प्राण इतरान् प्राणान् पृथक् पृथगेव संनिधत्ते ॥ ४ ॥

४. जसा राजा स्वतः कामगार नेमतो (व त्यांस) 'तूं हे गांव संभाळ, तूं हे गांव संभाळ' अशी (आज्ञा करतो); त्याचप्रमाणें (मुख्य) प्राण हा इतर प्राणांस (त्या त्या) निरनिराळ्या ठिकाणीं नेमतो (व कामाला लावतो).

टीप—(१)पृथक्, यथास्थानं.

पायूपस्थेऽपानं, चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रातिष्ठते, मध्ये तु समानः । एष ह्येतद्धुतं अन्नं समं नयति, तस्माद् एताः सप्तार्चिषो भवंति ॥ ५ ॥

५. (तो प्रकार असा.) गुदद्वार व मूत्रस्थान येथें अपान (असतो), डोळे कान तोंड नाक येथें (मुख्य) प्राण स्वतः वावरतो, आणि मध्यभागीं समान (काम करतो). तो (जठरांत) सेवन केलेलें अन्न सारखें (योग्य ठिकाणीं) नेतो, व त्यामुळें सात ज्वाळा उद्भवतात.

टीपा—(१)एष०, एषः हि एतद् हुतं अन्नं. (२) सप्तार्चिषः, सात ठिकाणचें तेज.

हृदि ह्येष आत्मा । अत्रैतद् एकशतं नाडीनां, तासां शतं शतं एकैकस्यां, द्वासप्ततिर् द्वासप्ततिः प्रतिशाखानाडीसहस्राणि भवंत्यासु व्यानश्चरति ॥ ६ ॥

६. आत्मा हा हृदयांत (असतो). तेथें एक शें एक (मुख्य) नाड्या आहेत; त्यांपैकीं प्रत्येकीला शंभर शंभर (शाखानाड्या आहेत); (आणि प्रत्येक शाखानाडीला) बाहात्तर बाहात्तर हजार प्रतिशाखानाड्या आहेत. अशांतून व्यान हा (देहभर) वावरत असतो.

टीपा.—(१)अत्र अस्मिन् हृदये एकशतं एकोत्तरशतं संख्यया प्रधाननाडीनां भवति. 'शतं चैका च हृदयस्य नाड्यः ।'–कठ०. (२) व्यानो व्यापनात्; आदित्यादिव रश्मयो हृदयात् सर्वतोगामिनीभिर् नाडीभिः सर्वदेहं संव्याप्य व्यानो वर्तते. उच्छ्वासनिश्वासयोः संधौ प्राणापानवृत्योर् अभावे व्यानवृत्तिर् उद्भवति.

अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति, पापेन पापं, उभाभ्यां एव मनुष्यलोकं ॥ ७ ॥

७. आतां, एक जी (प्रधान नाडी सुषुम्णा) तिच्या द्वारें वर जाणारा उदान हा पुण्यकर्म (अधिक) असल्यास (जीवाला) पुण्यलोकीं नेतो, पापकर्म (अधिक) असल्यास पापलोकीं नेतो, (आणि पुण्य पाप) दोन्ही (समान) असल्यास मनुष्यलोकीं नेतो.

टीपा.—(१)अथ एकया ऊर्ध्वः सन् उदानः. (२)पुण्याधिक्ये देवलोकं, पापाधिक्ये नरकलोकं, समपुण्यपापाभ्यां मनुष्यलोकं, नयति.

आदित्यो ह वै बाह्यः प्राण, उदयत्येष ह्येनं चाक्षुषं प्राणं अनुगृह्णानः। पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्यापानं अवष्टभ्यांतरा यद् आकाशः स समानो, वायुर् व्यानः ॥ ८ ॥

८. आदित्य जो तो बाह्य प्राण (होय); तो उगवतो (तेव्हां सर्वत्र प्रकाश पाडून) डोळ्यांतील प्राणावर अनुग्रह करतो. पृथिवींत जी देवता (आहे) ती (सर्व वस्तूंचें) आकर्षण करून मनुष्यांतील अपानावर अनुग्रह करते; अंतराळांतील आकाशवायु हा समान होय (म्हणजे समानासारखा मध्यवर्ती राहून समानावर अनुग्रह करतो; आणि बाहेर वाहणारा) वायु हा व्यान होय (म्हणजे व्यानाप्रमाणें सर्व व्यापून व्यानावर अनुग्रह करतो).

टीपा.—(१)अवष्टभ्य, अन्यथा हि शरीरं गुरुत्वात् पतेत् सावकाशे वा उद्गच्छेत्. (२) यद् आकाशः, यद् इति क्लीबत्वं छांदसं, 'यः आकाशः.'

तेजो ह वा उदानस्, तस्माद् उपशांततेजाः। पुनर्भवं इंद्रियैर् मनसि संपद्यमानैः ॥ ९ ॥

९. आणि तेज हें उदान होय (तें उदानावर अनुग्रह करतें). म्हणून (जेव्हां मनुष्याचें) तेज लय पावतें (तेव्हां तो मरतो). (मग तो) मनाचे ठायीं एकवटलेल्या इंद्रियांसह दुसरा जन्म (घेण्यास जातो).

टीपा.—(१) उपशांततेजाः, यदा पुरुषः उपशांततेजाः भवति, (तदा तं क्षीणायुषं विद्यात्). (२) पुनर्भवं, शरीरांतरं प्रतिपद्यते.

यच्चित्तस् तेनैष प्राणमायाति, प्राणस् तेजसा युक्तः सहात्मना यथा-संकल्पितं लोकं नयति ॥ १० ॥

१०. (मरणसमयीं मनुष्याचें) जिकडे चित्त असेल त्याप्रमाणें तो प्राणाच्या अवस्थेंत जातो; मग तो प्राण तेजानें युक्त असा आत्म्याला बरोबर घेऊन (निघतो आणि) त्याला यथासंकल्पजन्य लोकाप्रत नेऊन पोहंचवितो.

टीप.—(१) यथासंकल्पितं, प्राणः तं भोक्तारं पुण्यपापकर्मवशाद् यथाभिप्रेतं लोकं प्रापयाति.

य एवं विद्वान् प्राणं वेद । न हास्य प्रजा हीयतेऽमृतो भवति, तदेष श्लोकः ॥ ११ ॥

११. जो ज्ञाता याप्रमाणें प्राणाला ओळखील त्याची (इहलोकीं पुत्रपौत्रादि) प्रजा नाश पावणार नाहीं (आणि तो परलोकीं) अमर होईल. या अर्थाचा एक श्लोक आहे तो असा—

टीप.—(१)तद्, एतस्मिन्न् अर्थे संक्षेपाभिधायक एष मंत्रो भवति.

उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पंचधा ।
अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायामृतमश्नुते,
विज्ञायामृतमश्नुते, इति ॥ १२ ॥

१२. प्राणाची उत्पत्ति, त्याचें प्रवर्तन, त्याचें वास्तव्य, त्याची पांच ठिकाणीं अधिकारस्थापना, तसाच त्याचा देहाआंतील व्यापार, याचें विज्ञान झालें असतां (मनुष्य) अमरत्व पावतो—विज्ञान झालें असतां (मनुष्य) अमरत्व पावतो.

टीपा.—(१)विभुत्वं स्वाम्यं. पांच ठिकाणीं स्वामित्व. विभुत्व याचा अर्थ 'विविध-भवनं', अनेक प्रकारचा होणें, ('Separation'-Mead) असा कोणी घेतात. (२) विवेचनाचा एक भाग संपला हें दर्शविण्यासाठीं 'विज्ञायामृतमश्नुते' हे शब्द दोन वेळ लिहिले आहेत.

याप्रमाणें तिसऱ्या प्रश्नाचा विचार झाला.

प्रश्न चौथा.

अथ हैनं सौर्यायणी गार्ग्यः पप्रच्छ 'भगवन्न् एतस्मिन् पुरुषे कानि स्वपंति, कान्यस्मिन्न् जाग्रति, कतर एष देवः स्वप्नान् पश्यति, कस्यैतत् सुखं भवति, कस्मिन् नु सर्वे संप्रतिष्ठिता भवंति' इति ॥ १ ॥

१. नंतर त्या (पिप्पलाद ऋषीला) सौर्यायणिवंशी गार्ग्य (प्रश्न) विचारता झाला कीं ' भगवन् मनुष्यामध्यें कोणते (देव) झोंपीं जातात ? त्यांत कोणते जागृत रहातात ? कोणता देव स्वप्नें पाहातो ? (गाढ निद्रेंत) सुख होतें तें कोणाला ? (आणि त्या वेळीं) कोणामध्यें बरें ते सर्व (जाऊन) संप्रतिष्ठित होतात ? '

टीपा—(१)स्वपंति, स्वव्यापाराद् उपरमंते. (२) स्वप्नो नाम जाग्रद्दर्शनात् निवृत्तस्य जाग्रद्वद् अंतःशरीरे यद् दर्शनं. (३) एतत् सुखं, उपरते जाग्रत्स्वप्नव्यापारे यत् प्रसन्नं निरायासलक्षणं अबाधं सुखं. (४) संप्रतिष्ठिताः, तस्मिन् काले कस्मिन् नु सर्वे सम्यग् एकीभूताः. (पुढें ७ व्या श्लोकांत याचें उत्तर 'तत् सर्वं परे आत्मनि संप्रतिष्ठते' असें आलें आहे).

तस्मै स होवाच । यथा गार्ग्य मरीचयोऽर्कस्यास्तं गच्छतः सर्वा एतस्मिंस्तेजोमंडल एकीभवंति । ताः पुनः पुनरुदयतः प्रचरंति । एवं ह वै तत् सर्वं परे देवे मनस्येकीभवति । तेन तर्ह्येष पुरुषो न शृणोति, न पश्यति , न जिघ्रति, न रसयते, न स्पृशते, नाभिवदते, नादत्ते, नानंदयते, न विसृजते, नेयायते, 'स्वपिति' इत्याचक्षते ॥ २ ॥

२. त्याला तो म्हणाला कीं ' हे गार्ग्य, जसे किरण सूर्य अस्तास जात असतां सगळे त्या तेजोगोलांत (येऊन) एकवटतात, (आणि) ते मग पुन्हा (सूर्य) उगवत असतां (त्यांतून निघून) बाहेर फांकतात; थेट त्याप्रमाणें (इंद्रियस्थ) सर्व (शक्ति) पर देव जें मन त्यांत एकवटतात, (व) त्यामुळेंच तर (निजलेला) मनुष्य ऐकत नाहीं, पाहात नाहीं, वास घेत नाहीं, रस घेत नाहीं, स्पर्श ओळखीत नाहीं, (विचारल्यास) बोलत नाहीं, घेत नाहीं, आनंदित होत नाहीं, (मलमूत्रादि) बाहेर टाकीत नाहीं, हालचाल करीत नाहीं, (लोक) म्हणतात ' तो निजला आहे.'

टीपा.—(१)परे देवे, चक्षुरादिदेवानां मनस्तंत्रत्वात् परो देवो मनः. (२) 'न स्पृशते' या पदांचा 'स्पर्श करीत नाहीं' असाही अर्थ होईल.

प्राणाग्नय एवैतस्मिन् पुरे जाग्रति । गार्हपत्यो ह वा एषोऽपानो, व्यानोऽन्वाहार्यपचनो, यद् गार्हपत्यात् प्रणीयते प्रणयनाद् आहवनीयः प्राणः ॥ ३ ॥

३. (मनुष्य निजला असतां) त्याच्या ह्या (देहरूप) घरांत (पंच) प्राणाग्नीच काय ते जागे असतात. (त्यांत) गार्हपत्यासारखा अपान होय, अन्वाहार्यपचनासारखा व्यान होय, (आणि) गार्हपत्यापासून नेला जातो म्हणून नेण्याच्या (साम्या) मुळें आहवनीयासारखा प्राण होय.

टीपा.—(१)पुर ह्या पदाचा अर्थ नगर, गृह, देवालय असा घेतात. (२) प्राणाग्नि, पंच प्राण हे पांच अग्नींसारखे आहेत. गार्हपत्य पश्चिमेकडचा तसा अपान पश्चिमेकडचा; अन्वाहार्यपचन दक्षिणेकडचा तसा व्यान दक्षिणेकडचा; आहवनीय हा गार्हपत्यापासून नेतात तसा प्राण हा अपानापासून निघतो. बाकीच्या दोहोंचा विचार पुढल्या श्लोकांत आहे.

यद् उच्छ्वासनिश्वासावेतावाहुती समं नयतीति स समानः । मनो ह वाव यजमानः; इष्टफलं एवोदानः, स एनं यजमानं अहरहर् ब्रह्म गमयति ॥ ४ ॥

४. उच्छ्वासनिश्वासरूप ज्या (दोन) आहुत्या त्यांस सारखें नेतो म्हणून (देहांतील) तो समान (अग्निस्थानीं मानलेल्या होत्यासारखा आहे). मन जें तें खरोखर यजमाना (सारखें होय). (आणि यज्ञांतील) इष्टफलासारखा उदान (असून) तो ह्या (मनोरूप) यजमानाला प्रत्यहीं (सुषुप्तिकालीं) ब्रह्माप्रत नेतो.

टीपा.—(१)समानः वायुः अग्निस्थानीयः होता. (२) अतश्च विदुषः स्वापोपि अग्निहोत्रहवनमेव. (जाणता मनुष्य निजला असला तरी त्याचें हवन चाललें असतें).

अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति । यद् दृष्टं दृष्टं अनुपश्यति, श्रुतं श्रुतमेवार्थं अनुशृणोति, देशदिगंतरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभ-

वति । दृष्टं चादृष्टं च, श्रुतं चाश्रुतं च, अनुभूतं चाननुभूतं च, सच्चासच्च, सर्वं पश्यति सर्वः पश्यति ॥ ५ ॥

५. तेव्हां (जाग्रत् आणि सुषुप्ति ह्या अवस्थांच्या मध्यंतरीं) स्वप्नदशेंत हा (मनोरूपी) देव (स्वतःच्या) महिम्याचा अनुभव घेतो. तो असा. (पूर्वी) जें जें पाहिलें असेल तें तें पुन्हा पाहातो, जें जें कांहीं ऐकलें असेल तें तें पुन्हा ऐकतो, अनेक देशीं व अनेक दिशांचे ठायीं जें जें अनुभविलें असेल तें तें पुनःपुन्हा अनुभवितो. (तसेंच ह्या जन्मांत) पाहिलेलें आणि न पाहिलेलें, ऐकलेलें आणि न ऐकलेलें, अनुभविलेलें आणि न अनुभविलेलें, सत् आणि असत्, (असें) सर्व (तो) पाहातो—(तो तें) सर्व (समुच्चयरूप) होऊन पाहातो.

टीपा—(१)अदृष्टं च, अस्मिन् जन्मनि अदृष्टं जन्मांतरदृष्टं, अत्यंतादृष्टे वासनानुपपत्तेः. (२) सर्वः, सर्वकरणात्मा मनोदेवः (सर्व इंद्रियें ज्यांत विलीन झालीं आहेत असें मन).

स यदा तेजसाभिभूतो भवति, अत्रैष देवः स्वप्नान् न पश्यति; अथ तदैतस्मिञ्छरीर एतत् सुखं भवति ॥ ६ ॥

६. तो जेव्हां तेजानें व्याप्त होतो त्या वेळीं तो देव स्वप्नें पाहात नाहीं; मग अशा अवस्थेंत ह्या देहांत तें (विज्ञानमय व निराबाध) सुख होतें.

टीपा—(१)अभिभूतः, नाडीशयेन सौरेण तेजसा अभिभूतः तिरस्कृतवासनाद्वारः. (२) स्वप्नान् न पश्यति दर्शनद्वारस्य निरुद्धत्वात् तेजसा. (३) 'सुखं भवति' (सुख होतें). 'कस्य सुखं भवति' (गाढ निद्रेंत सुख होतें तें कोणाला) असा प्रश्न असतां 'सुखं भवति' या उत्तरांत तें कोणाला होतें ह्याचा स्पष्ट निर्देश केलेला दिसत नाहीं. यावर शंकरानंद म्हणतो 'आत्मनः एव सुखं भवति इति अभिप्रायः'; आणि आनंदगिरि म्हणतो 'स्वरूपसुखं एव निर्वातस्थदीपप्रभावत् सम्यक् प्रकाशते.'

स यथा सोम्य वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठंते, एवं ह वै तत् सर्वं पर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ७ ॥

७. (गाढ निद्रेंत सर्व कोठें जाऊन रहातें तें दृष्टांतानें शिकवितात,) तो (असा). मुला, (सायंकाळीं) जसे पक्षी वासवृक्षावर (येऊन)

जमा होतात, तसें तें (देहांतील) सर्व कांहीं (गाढनिद्राप्रसंगीं) पर आत्म्याचे ठायीं (येऊन) संप्रतिष्ठित होतें.

टीपा—(१)सः, स दृष्टांतः. (२) वासोवृक्षः, (छांदस) वासवृक्षः.

पृथिवी च पृथिवीमात्रा च, आपश्चापोमात्रा च, तेजश्च तेजोमात्रा च, वायुश्च वायुमात्रा च, आकाशश्चाकाशमात्रा च; चक्षुश्च द्रष्टव्यं च, श्रोत्रं च श्रोतव्यं च, घ्राणं च घ्रातव्यं च, रसश्च रसयितव्यं च, त्वक् च स्पर्शयितव्यं च, वाक् च वक्तव्यं च, हस्तौ चादातव्यं च, उपस्थश्चानंदयितव्यं च, पायुश्च विसर्जयितव्यं च, पादौ च गंतव्यं च; मनश्च मंतव्यं च, बुद्धिश्च बोद्धव्यं च, अहंकारश्चाहंकर्तव्यं च, चित्तं च चेतयितव्यं च, तेजश्च विद्योतयितव्यं च, प्राणश्च विधारयितव्यं च ॥ ८ ॥

८. (तें सर्व हें होय.–) पृथिवी आणि पृथिवीचें सूक्ष्म रूप, जल आणि जलाचें सूक्ष्म रूप, तेज आणि तेजाचें सूक्ष्म रूप, वायु आणि वायूचें सूक्ष्म रूप, आकाश आणि आकाशाचें सूक्ष्म रूप; (त्याचप्रमाणें) चक्षु आणि (त्याचें) दर्शनकार्य, श्रोत्र आणि त्याचें श्रवणकार्य, घ्राण आणि (त्याचें) घ्राणकार्य, रस आणि (त्याचें) रससेवनकार्य, त्वचा आणि (तिचें) स्पर्शकार्य, वाचा आणि तिचें भाषणकार्य, दोन हात आणि (त्यांचें) ग्रहणकार्य, जननेंद्रिय आणि (त्याचें) आनंदकार्य, मलद्वार आणि (त्याचें) विसर्जनकार्य, दोन पाय आणि (त्यांचें) गमनकार्य; (तसेंच) मन आणि त्याचें मननकार्य, बुद्धि आणि (तिचें) बोधकार्य, अहंकार आणि (त्याचें) अहंकारकार्य, चित्त आणि चित्ताचें (चित्तवृत्ति) कार्य, तेजोमंडल आणि (त्याचें) द्योतनकार्य, (आणि) प्राण व (त्याचें) धारणकार्य. (इतकीं हीं गाढनिद्राप्रसंगीं आत्म्याचे ठायीं जाऊन संप्रतिष्ठित होतात).

टीप.—(१)तेज हा शब्द प्रस्तुत मंत्रांत दोन ठिकाणीं आला आहे. पहिला तेज शब्द पंच भूतांपैकीं तेजाचा वाचक आहे; दुसरा तेज शब्द संदर्भावरून मनुष्यदेहासभोंवतीं असणाऱ्या तेजोमंडलाचा वाचक दिसतो. आचार्य याला 'त्वगिंद्रियव्यतिरेकेण प्रकाशविशिष्टा त्वक्' म्हणतात. थिआसफीच्या भाषेंत याला Aura (तेजोमंडल) किंवा Auric Egg (तैजस अंड) म्हणतात.

'The outline of the ego, the Thinker, is oval in shape and hence this body of Manas is called the Auric Egg. As it develops, it becomes a radiant object of supernal glory and beauty, the Shining One, as it has been aptly named.'—*Ancient Wisdom. P. 168.*

एष हि द्रष्टा, स्प्रष्टा, श्रोता, घ्राता, रसयिता, मंता, बोद्धा, कर्ता, विज्ञानात्मा पुरुषः । स परेऽक्षर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ९ ॥

९. देहनिवासी (जो) विज्ञानात्मा तो पाहाणारा, स्पर्श करणारा, ऐकणारा, वास घेणारा, रस घेणारा, विचार करणारा, जाणणारा, कर्म करणारा (असून) तो पर (अशा) अक्षर आत्म्यांत (जाऊन) संप्रतिष्ठित होतो.

टीपा.—(१) विज्ञानात्मा, विज्ञानमयकोशांत वावरणारा जीव. (२) पुरुष, पुरि शेते (देहांत रहातो) असा देही, देहनिवासी. (३) मंता, थिआसफीच्या भाषेंत Thinker.

'What is this Thinker? He is the divine Self limited or individualised by the subtle body drawn from the matter of the mental plane. This matter encloses him within a filmy shell of itself and so makes it an individual. Human evolution is the evolution of the Thinker. (He works in the Vidnyânamaya Kosha).' —*Ancient Wisdom. P. 169.*

परं एवाक्षरं प्रतिपद्यते स यो ह वै तद् अच्छायं, अशरीरं, अलोहितं, शुभ्रं, अक्षरं, वेदयते; यस्तु सोम्य— स सर्वज्ञः सर्वो भवति ; तद् एष श्लोकः ॥ १० ॥

१०. पर (आणि) अक्षर (असें दिव्यतत्त्व) त्यालाच प्राप्त होतें कीं जो तें छायारहित, शरीररहित, रंगरूपरहित, शुद्ध, (व) अक्षर (तत्त्व ज्ञानानें) ओळखतो. आणि मुला जो (तें ज्ञानानें ओळखतो) तो सर्वज्ञ (व) सर्वात्मक होतो. या अर्थाचा असा (एक) श्लोक (आहे)—

टीपा—(१)कांहीं प्रतींत 'परं एवाक्षरं प्रतिपद्यते' इतके शब्द नाहींत. (२) 'शुभ्रं, अक्षरं' यांच्या पुढें भाष्यकारांनीं 'सत्यं, अप्राणं, शिवं, अजं' इतकीं विशेषणें आणखी घेतलीं आहेत. (३) अक्षरं हा शब्द दोन वेळ आला आहे. 'अक्षरं यो अक्षरं वेदयते'--तें अक्षर तत्त्व अक्षर असलेलें जो ओळखतो. (४) अलोहितं, लोहितादिसर्वगुणवर्जितम्. (५) शुभ्रं, शुद्धम्.

विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः,
प्राणा भूतानि संप्रतिष्ठंति यत्र;
तदक्षरं वेदयते यस्तु सोम्य,
स सर्वज्ञः सर्वमेवाविवेश; इति ॥ ११ ॥

११. सर्व देवांसह विज्ञानात्मा, (व) प्राण, (व) भूतें, (हीं) ज्यांत प्रविष्ट होतात, तें अक्षर (दिव्यतत्त्व) जो (ज्ञानानें) ओळखतो तो, हे मुला, सर्वज्ञ (होऊन) सर्व (जें त्याच्याशीं) एक होतो.

टीपा.—(१)संप्रतिष्ठंति, प्रविशंति. (२) आविवेश, आविशति, प्रविष्ट किंवा लीन होतो.

यांप्रमाणें चौथ्या प्रश्नाचा विचार झाला.

प्रश्न पांचवा.

अथ हैनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ 'स यो ह वै तद् भगवन् मनुष्येषु प्रायणांतं ओंकारं अभिध्यायीत, कतमं वाव स तेन लोकं जयति' इति ॥ १ ॥

१. नंतर त्या (पिप्पलाद ऋषीला) शैब्यवंशी सत्यकाम (प्रश्न) विचारता झाला कीं 'भगवन् मनुष्यांमध्यें जो कोणी देह सुटेपर्यंत ओंकराचें (मुख्यतः) ध्यान करीत राहील तो कोणता लोक बरें मिळवील?'

टीपा.—(१)प्रायणांतं, मरणांतं यावज्जीवं (प्र–अयन). वास्तविक पाहातां प्र–अयन म्हणजे (देहा) 'बाहेर–जाणें.' हा मरणाचाच प्रसंग असला पाहिजे असें नाहीं. खऱ्या ध्यानांतही ध्यानी हा जड देहाबाहेर जातो. तो जाणीव कायम राखून

ध्यानदशेंतच भूः भुवः स्वः ह्या अवस्थांत जाऊन ज्ञान मिळवूं शकतो, व ह्या कामीं त्याला ओंकाराच्या अ उ म् ह्या मात्रांचा विनियोग उपयोगीं पडतो. प्रस्तुतच्या तीन चार श्लोकांत ह्या ध्यानप्रकाराला अनुलक्षून लिहिलें आहे असा आमचा समज आहे. (२) अभिध्यायीत, 'अभिमुख्येन चिंतयेत् । बाह्यविषयेभ्यः उपसंहृतकरणः समाहितचित्तः भक्त्यावेशितब्रह्मभावे ओंकारे । आत्मप्रत्ययसंतानाविच्छेदः भिन्नजातीयप्रत्ययान्तराखिलीकृतः निर्वातस्थदीपशिखासमः अभिध्यानशब्दार्थः ।' (ओंकाराचें अभिध्यान म्हणजे मुख्यतः त्याचेंच चिंतन. त्या प्रसंगीं सर्व चित्त बाह्य विषयांवरचें निघून ब्रह्मात्मक मानलेल्या ओंकारीं स्थिर असतें, व तेव्हां आत्मानुभवाशिवाय दुसरा कसला भास होत नसून त्या आत्मानुभवाची एकतानता निर्वात जागीं प्रकाशित असलेल्या दीपज्योतीप्रमाणें संतत व अभंग चालू असते). हें आचार्यांनीं केलेलें ध्यानावस्थेचें वर्णन होय.

तस्मै स होवाच । एतद् वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यद् ओंकारः । तस्माद् विद्वान् एतेनैवायतनेनैकतरं अन्वेति ॥ २ ॥

२. त्याला तो म्हणाला कीं हे सत्यकाम जो ओंकार तो वास्तविक पर ब्रह्म आणि अपर ब्रह्म (अशा स्वरूपाचा) होय; म्हणून ज्ञाता असतो त्याला ह्या साधनानें त्यांपैकीं (इष्ट असेल तें) कोणतेंही प्राप्त होतें.

टीपा.—(१)परं च अपरं च, परं सत्यं अक्षरं अपरं च प्राणाख्यं प्रथमजं. 'परं हि ब्रह्म शब्दादि-उपलक्षण-अनर्हं सर्वधर्मविशेषवर्जितं अतः न शक्यं अतींद्रियगोचरत्वात् केवलेन मनसा अवगाहितुं, ओंकारे तु विष्ण्वादिप्रतिमास्थानीये भक्त्यावेशितब्रह्मभावे ध्यायिनां तत् प्रसीदति इति अवगम्यते शास्त्रप्रामाण्यात्.' (२) आयतन,–घर, वाहन, साधन, आधार. (३) एतेन, एतेन आत्मप्राप्तिसाधनेन ओंकाराभिध्यानेन.

स यद्येकमात्रं अभिध्यायीत स तेनैव संवेदितस् तूर्णमेव जगत्यां अभिसंपद्यते । तं ऋचो मनुष्यलोकं उपनयंते, स तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संपन्नो महिमानं अनुभवति ॥ ३ ॥

३. जर कोणीं (ओंकाराचें) ध्यान एकमात्रेनें केलें तर तेणेंकरून (तशा) संवेदनेनें युक्त (होऊन) तो लागलाच भूलोकाचे ठायीं प्रविष्ट होतो. त्याला ऋग्वेदमंत्र मनुष्यलोकीं पोहंचवितात, (व) तो तेथें तपानें ब्रह्मचर्यानें (आणि) श्रद्धेनें युक्त (असल्यामुळें) महिम्याचा अनुभव घेतो.

टीपा.—(१)एकमात्रं; ओंकार हा विशिष्ट नाद असून त्याच्या अ उ म् ह्या तीन मात्रा होत. भूः भुवः स्वः ह्या लोकींचें विज्ञान पाहिजे असल्यास अ उ म् ह्यांपैकीं एकेका मात्रेला प्राधान्य देण्यांत येतें. प्रस्तुत वचनांत 'एकमात्रं' म्हणजे 'एक मात्रा जी पहिली अ तिला प्राधान्य देऊन.' हा त्रिमात्रक विनियोग नानात्वाच्या विज्ञानासाठीं अंगिकारावा लागतो; पण एकत्वाच्या अनुभवप्रसंगीं ओंकार अमात्रकच घेतात. हे ध्वनि महाशक्तिमान आहेत.

'The three are summed up in what is called the fourth, though truly the fourth is the summation of the three, merged into the One Reality.'

'The results which follow from this Word of Power, the Aum, are the mightiest, the most compelling, for that Word represents in its three letters everything which exists—the threefold Brahman as manifest, the One as unmanifest; when pronounced as a triplicity, it means the threefold manifested Brahman, and when pronounced as a unit, it means the Nirguna Brahman. Hence is it the most holy of all Sacred Words.'
—*Wisdom of the Upanishads. Pp. 12, 15.*

(२) संवेदितः संबोधितः. (३) जगत्यां पृथिव्यां. (४) ऋचः, ऋग्वेदरूपा हि ओंकारस्य प्रथमा एकमात्रा अभिध्याता.

अथ यदि द्विमात्रेण, मनसि संपद्यते । सोऽन्तरिक्षं यजुर्भिर् उन्नीयते सोमलोकं । स सोमलोके विभूतिं अनुभूय पुनरावर्तते ॥ ४ ॥

४. आणि जर (कोणीं) द्विमात्रेनें (ओंकाराचें ध्यान केलें तर तो) मनाचे ठायीं प्रविष्ट होतो. तो यजुर्वेदमंत्रांनीं अंतरिक्षांतील सोमलोकाप्रत वर नेला जातो. तो सोमलोकाचे ठायीं विभूतीचा अनुभव घेऊन पुन्हा (खालीं स्थूल देहांत) परत येतो.

टीप.—(१)द्विमात्रेण, दुसरी मात्रा जी 'उ' तिला प्राधान्य देऊन.

यः पुनर् एतं त्रिमात्रेणोम् इत्येतेनैवाक्षरेण परं पुरुषं अभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः । यथा पादोदरस् त्वचा विनिर्मुच्यत एवं ह वै

स पाप्मना विनिर्मुक्तः स सामभिर् उन्नीयते ब्रह्मलोकं, स एतस्माज् जीवघनात् परात्परं पुरिशयं पुरुषं ईक्षते । तद् एतौ श्लोकौ भवतः ॥५॥

५. आणि जो त्रिमात्रेनें ओम् ह्याच अक्षराच्या द्वारें त्या पर पुरुषाचें ध्यान करतो तो तेजोमय अशा सूर्यलोकीं प्रविष्ट होतो. जसा सर्प त्वचेंतून सुटतो तसा तो (माणूस) पापांतून सुटतो (व) तो सामवेदमंत्रांनीं ब्रह्म-लोकाप्रत वर नेला जातो; तो (तेथें) ह्या जीवभावरूप घनदाट (आवर-णाच्या) पलिकडे परम दिव्यात्म्याला ' (देहरूप) पुरांत रहाणारा पुरुष हा ' असा निरीक्षण करतो. या (अर्थाचे) दोन श्लोक आहेत (ते असे)—

टीपा.—(१)त्रिमात्रेण, तिसरी मात्रा म् तिला प्राधान्य देऊन. (२) त्रिमा-त्रेण + ओम् , येथें अ + ओ यांचा संधि 'औ' व्हावयाचा परंतु 'ओमाङोश्र' या सूत्रानें ओचाच आदेश झाला आहे. (शिवाय + ओम् = शिवायोम् ; शिव + एहि = शिवेहि). (३) पादोदरः पाद + उदर, पोट हा पाय ज्याचा, पोटानें चालणारा, सर्प. (४) पुरिशयं पुरुषं; पुरि (पुर् देह) देहांत शेते रहातो म्हणून ' पुरुष ' म्हटलेला. पुरुष म्हणजे दिव्यात्मा. इंग्रजी भाषांतरकार ह्या 'पुरुष' शब्दाचें Man (मनुष्य) असें भाषांतर करतात, त्यापेक्षां Spirit (दिव्यात्मा) असें केलेलें बरें.

'तिस्रो मात्रा मृत्युमत्यः, प्रयुक्ता
अन्योन्यसक्ता अनविप्रयुक्ताः ।
क्रियासु बाह्याभ्यंतरमध्यमासु
सम्यक् प्रयुक्तासु, न कंपते ज्ञः' ॥ ६ ॥

६. (निरनिराळ्या घेतांना प्रयोग चुकला तर) तीन मात्रा मृत्युयुक्त (होतात); (पण त्या जर) निराळ्या घेण्याचें न टाकतां एकमेकींना जुळ-वून प्रयोगाला घेतल्या (व अशा त्या) योग्य प्रकारें आचरलेल्या बाह्य-मध्यम-अभ्यंतर अशा ध्यानक्रियांचे कामीं (लावल्या, तर त्रिमात्रक ओंका-राचा विनियोग) जाणणारा (साधक) कंप पावत नाहीं.

टीपा—(१)मृत्युमत्यः, म्हणजे संवेदना देहाबाहेर जागृत रहाण्यास त्यांचें साह्य होणार नाहीं. आत्म्यानें देहांत मग्न होऊन स्वतःला विसरून जाणें या अवस्थेला वेदां-ताच्या परिभाषेंत मृत्यु म्हणतात. (२) अन्योन्यसक्ताः, अ उ म् ह्या एकमात्र द्विमात्र

त्रिमात्र अशा त्या त्या वेळीं ध्वनीचे ठायीं जुळवून. (३) अनविप्रयुक्ताः, अन् + अ + वि+प्रयुक्त. वि निरनिराळ्या, प्रयुक्त योजावयाच्या, अ नाहींत, असें अन् नाहीं. अ उ म् असा निराळेपणा तर राखावयाचाच. (४) क्रियासु, ध्यानक्रियासु, योगक्रियासु. (५) बाह्याभ्यंतरमध्यमासु, '**बाह्यांतरमध्यमासु**' असा पाठ जास्त ग्राह्य दिसतो पण त्याला आधार नसल्यामुळें तो मुळांत देतां येई ना. (६) बाह्य + मध्यम + अभ्यंतर, स्थूल सूक्ष्म कारण अशा तीन भूमिकांवर. (७) ज्ञः, ओंकारस्य यथोक्तविभागज्ञः.

ऋग्भिरेतं, यजुर्भिरंतरिक्षं,
सामभिर् यत् तत् कवयो वेदयंते ;
तमोंकारेणैवायतनेनान्वेति विद्वान्,
यत् तच्छांतमजरममृतमभयं परं च; इति ॥ ७ ॥

७: (जे) विद्यावंत (ते) ऋग्वेदमंत्रांनीं हा लोक जाणतात, यजुर्वेदमंत्रांनीं अंतरिक्षलोक (जाणतात), सामवेदमंत्रांनीं तो (ब्रह्मलोक जाणतात). अशा (त्रिविध लोकाप्रत) विद्वान जातो तो जसा ओंकाररूप साधनानें, (तसाच तो) शांत–अजर –अमृत –अभय असें पर (दिव्यतत्त्व) देखील (त्यानेंच मिळवितो).

टीपा—(१)कवयः, मेधाविनः विद्यावंतः. (२) तं, त्रिविधं लोकं. (३) अजरं, जरावर्जितं; जरारहित.

याप्रमाणें पांचव्या प्रश्नाचा विचार झाला.

प्रश्न सहावा.

अथ हैनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ । भगवन् हिरण्यनाभः कौसल्यो राजपुत्रो मां उपेत्यैतं प्रश्नं अपृच्छत । 'षोडशकलं भारद्वाज पुरुषं वेत्थ?' । तं अहं कुमारं अब्रुवं 'नाहं इमं वेद, यद्यहं इमं अवेदिषं कथं ते नावक्ष्यं' इति । 'समूलो ह वा एष परिशुष्यति योऽनृतं अभिवदति तस्मान् नार्हाम्यनृतं वक्तुं' । स तूष्णीं रथं आरुह्य प्रवव्राज । तं त्वा पृच्छामि 'कासौ पुरुषः' इति ॥ १ ॥

१ नंतर त्या (पिप्पलाद ऋषीला) भारद्वाजवंशी सुकेश (प्रश्न) विचारता झाला कीं भगवन् कोसलदेशचा राजपुत्र हिरण्यनाभ (हा) मजकडे येऊन असा प्रश्न विचारता झाला कीं 'सोळा कलांनीं युक्त (असा) देही (आत्मा)

हे भारद्वाज तूं जाणतोस काय ?' त्या राजकुमाराला मी म्हणालों 'मला तो माहीत नाहीं; जर तो मला माहीत असता तर (त्याविषयीं) तुला मीं कसें सांगितलें नसतें ?' (त्याला खरें वाटे ना तेव्हां मी आणखी म्हणालों) 'जो खोटें बोलेल तो (वृक्ष मुळापासून सुकून जावा तसा) समूळ नाश पावेल असा नियम असल्यामुळें मी खोटें बोलण्याला कधींही प्रवृत्त होणार नाहीं.' (हें ऐकून) तो कांहीं न बोलतां रथांत बसला आणि निघून गेला. (तर आतां) तोच (प्रश्न मी) आपल्याला विचारतों कीं '(असा) तो आत्मा कोठें असतो ?'

टीपा—(१)अपृच्छत, अपृच्छत्. (२) षोडशकलं, अविद्यानिर्मित सोळा कलांचा आरोप ज्यावर होतो असा. ह्या कला पुढें चौथ्या श्लोकांत दिल्या आहेत. (३) तं पृच्छामि, भाष्यकार म्हणतात 'तं पुरुषं पृच्छामि'; पण संदर्भ पाहातां 'तं प्रश्नं पृच्छामि' असें घेणें जास्त सयुक्तिक दिसतें.

तस्मै स होवाच 'इहैवान्तःशरीरे सोम्य स पुरुषो यस्मिन्न् एताः षोडश कलाः प्रभवंति' इति ॥ २ ॥

२. त्याला तो म्हणाला कीं 'हे चांगल्या मुला, ज्याचे ठायीं त्या सोळा कला प्रादुर्भूत होतात तो (देही) आत्मा ह्या (आपल्या) देहांतच (असतो).'

टीप.—(१)अंतःशरीरे, हृदयकमलाकाशमध्ये.

स ईक्षांचक्रे 'कस्मिन्न् अहं उत्क्रांत उत्क्रांतो भविष्यामि, कस्मिन् वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामि' इति ॥ ३ ॥

३. तो (पुरुष सृष्टीच्या उत्पत्तिकालीं) चिंतन करता झाला कीं 'काय उत्क्रांत झालें असतां मी उत्क्रांत होईन, आणि काय प्रतिष्ठित झालें असतां मी प्रतिष्ठित होईन ?'

टीप.—(१)कस्मिन्, अन्वय 'कस्मिन् उत्क्रांते (सति) अहं उत्क्रांतः भविष्यामि.'

स प्राणं असृजत, प्राणाच्छ्रद्धां खं वायुर् ज्योतिर् आपः पृथिवीन्द्रियं मनोऽन्नं, अन्नाद् वीर्यं तपो मंत्राः कर्म लोका, लोकेषु च नाम च ॥ ४ ॥

४. (असें चिंतन करून) त्या (पुरुषानें) प्राण निर्माण केला, प्राणापासून श्रद्धा आकाश वायु तेज आप पृथिवी इंद्रियसमूह मन अन्न, अन्नापासून वीर्य तप मंत्र कर्म लोक, आणि लोकांमध्यें नामरूप (हीं निर्माण केलीं).

टीपा.—(१)असृजत, असृजत्. (२) वायुः, आपः, यांबद्दल भाष्यकारांनीं वायुं, अपः अशीं द्वितीयांत नामें घेतलीं आहेत. असृजत याचें कर्म म्हणून द्वितीया. (३) इंद्रियं, द्विप्रकारं बुद्ध्यर्थं कर्मार्थं च दशसंख्यं. (४) एवं एताः कलाः प्राणिनां अविद्यादिदोषबीजापेक्षया सृष्टाः, पुनः तस्मिन् एव पुरुषे प्रलीयंते हित्वा नामरूपादिविभागं.

स, यथेमा नद्यः स्यंदमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्यास्तं गच्छंति, भिद्येते तासां नामरूपे, ‘ समुद्रः ’ इत्येवं प्रोच्यते । एवं एवास्य परिद्रष्टुर् इमाः षोडश कलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्यास्तं गच्छंति, भिद्येते चासां नामरूपे, ‘ पुरुषः ’ इत्येवं प्रोच्यते । स एषोऽकलोऽमृतो भवति; तद् एष श्लोकः ॥ ५ ॥

५. (आणि त्या कला पुरुषांतच लय पावतात याला दृष्टांत) असा. जशा त्या नद्या समुद्राला जाऊन मिळण्यासाठीं वहातात व समुद्राला मिळाल्यावर (तेथें) अस्त पावतात आणि त्यांचें नामरूप लयास जातें व (फक्त) ‘ समुद्र ’ असेंच (लोक) बोलतात; त्याप्रमाणें जो (ज्ञाता) सर्वत्र (आत्मा) पाहातो त्याच्या त्या सोळा कला पुरुषाला येऊन मिळण्यास (प्रवृत्त होतात) आणि पुरुषाला येऊन मिळाल्यावर (तेथें) अस्त पावतात व त्यांचें नामरूप लयास जातें आणि (केवळ) ‘ पुरुष ’ असेंच (जाणते) बोलतात. असा तो (विद्यावंत) कलारहित आणि मृत्युरहित होतो. या अर्थाचा असा (एक) श्लोक (आहे)—.

टीपा.—(१)सः, सः दृष्टांतः. (२) समुद्रायणाः, समुद्रः अयनं गतिः यासां. (३) पुरुषायणाः, पुरुषः अयनं आत्मभावगमनं यासां. (४) पुरुषः, आत्मा, अंतरात्मा. (५) सः, य एवं विद्वान् गुरुणा प्रदर्शितकलाप्रलयमार्गः सः.

‘ अरा इव रथनाभौ कला यस्मिन् प्रतिष्ठिताः ।
तं वेद्यं पुरुषं वेद यथा मा वो मृत्युः परिव्यथा ’ इति ॥ ६ ॥

६. आरा जशा रथनाभींत (तशा) कला ज्या (पुरुषाचे) ठायीं प्रतिष्ठित आहेत त्या वेदनीय पुरुषाला जाणा म्हणजे तुम्हांला मृत्यूची बाधा होणार नाहीं.

टीपा—(१)तं पुरुषं, तं कलानां आत्मभूतं; पूर्णत्वात् पुरुषं पुरि शयनाद् वा. (२) मा वो, मा युष्मान् मृत्युः परिव्यथयतु. (३) आधार असता तर दुसऱ्या ओळीचा पाठ आम्हीं असा घेतला असता–‘**तं वेद्यं पुरुषं वेद, मा वो मृत्युपरिव्यथा ।**’

तान् होवाच ‘एतावद् एवाहं एतत् परं ब्रह्म वेद । नातः परं अस्ति ’ इति ॥ ७ ॥

७. (तो पिप्पलाद ऋषि) त्यांना म्हणाला कीं ' इतकें मला त्या परब्रह्माविषयीं माहीत आहे; त्याहून श्रेष्ठ (दुसरी ज्ञेय वस्तु) नाहीं.'

टीप.—(१)नातः परं, न अस्मात् प्रकृष्टतरं वेदितव्यं.

ते तं अर्चयंतम् ' त्वं हि नः पिता योऽस्माकं अविद्यायाः परं पारं तारयसि ' इति । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ८ ॥

८. ते (शिष्य) अर्चन करून (त्या ऋषीला म्हणाले) ' आपण आमचे (खरे) जनक; (कारण आपण) आम्हांला अविद्येच्या पर तीरावर (नेऊन) पोहंचविलें.' नमन असो परमऋषींना, नमन असो परमऋषींना !

इति षष्ठः प्रश्नः ।

टीपा—(१)अर्चयंतः, पूजयंतः पादयोः पुष्पांजलिप्रकिरणेन प्रणिपातेन च शिरसा. (२) पिता, ब्रह्मशरीरस्य विद्यया जनयितृत्वात्. (३) परमऋषिभ्यः ब्रह्मविद्यासंप्रदायकर्तृभ्यः Founders of Occult Schools. 'नमः परमऋषिभ्यः' इति द्विर्वचनं आदरार्थम्.

याप्रमाणें सहाव्या प्रश्नाचा विचार झाला.

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर् यजत्राः ॥
स्थिरैरंगैस् तुष्टुवांसस् तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥ १ ॥

स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ॥
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर् दधातु ॥ २ ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

(या श्लोकांचें भाषांतर आरंभीं एकदां आलें आहे.)

इत्यथर्ववेदीया प्रश्नोपनिषद् समाप्ता ।



ते ऐसे कैसेनि जाहाले । जे देहींचि ब्रह्मत्वा आले ॥
हें पुससी तरी भलें । संक्षेपें सांगों ॥ १ ॥

परी असो हें आघवें । एथ न बोलणें काय बोलावें ॥
ते खुणाची पावेल स्वभावें । आत्माराम ॥ २ ॥